Annexure XXXI(2),(Vide Article-31.01.02)

खर्चावर नियंत्रण ठेवण्यासंबंधी सूचना

**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
**परिपत्रक क्रमांकः- खर्चनि-१०.०६/प्र.क्र.१/अर्थोपाय**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक:२० एप्रिल, २००६**

**वाचा :-** १) शासन परिपत्रक क्रमांक : पी ५१८/प्र.क्र.१४६/१९९१, अर्थोपाय दि. १७/५/१९९१ ( प्रत जोडली आहे )
२) शासन परिपत्रक क्रमांक : पी ५१८/प्र.क्र.२७८/२०००, अर्थोपाय दि. ४ मे २००० ( प्रत जोडली आहे )

**परिपत्रक**

राज्याच्या अर्थोपाय परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून, राज्याच्या तिजोरीवर अचानक येणारा मोठ्या रकमांचा भार विचारात घेऊन संभाव्य अधिकर्ष टाळण्यासाठी व अधिकर्षाची रक्कम विहित मुदतीत परतफेड करणे शक्य व्हावे यासाठी शासनाने उपरोक्त परिपत्रकांव्दारे खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या हेतूने एकरकमी मुक्त करावयाच्या रकमेवर निर्बंध घातले असून रु.५० लक्षपेक्षा जास्त रक्कम वितरीत करण्यापूर्वी या विभागाच्या अर्थोपाय कार्यासनाची अनुमती घेण्याची अट घालण्यात आली आहे.

२. सन २००६-२००७ चा अर्थसंकल्प साधनसंपत्तीशी निगडीत असून सन २००५-०६ प्रमाणे या वर्षीही मासिक निधी विवरणपत्राप्रमाणे निधी उपलब्ध करुन घेण्यास विभागाला मुभा देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विभागाने पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन करणे आवश्यक राहील:-

(१) मूळ तरतूदी व पुरवणी मागण्यांन्वये केलेल्या तरतुदी वितरीत करतांना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.पी-५१८/प्र.क्र.२७८/२०००/अर्थोपाय, दिनांक ४ मे २००० अन्वये रु.५० लाखापेक्षा जास्त निधी प्रत्यक्षात मुक्त करण्यापूर्वी या विभागाच्या अर्थोपाय कार्यासनाची मान्यता आवश्यक होती, ती यापुढे लागणार नाही.

(२) अर्थसंकल्पाद्वारे उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून १००% रक्कम खर्चासाठी उपलब्ध करण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

D:\W&M\2006-07\Case Register\CR-001-06

(३) सदर कॅश फ्लोप्रमाणे करण्यात येणारा खर्च हा मंजूर योजनांसाठीच करण्यात यावा व तो खर्च मंजूर तरतूदीच्या मर्यादेत असावा.

(४) प्रत्येक लेखाशीर्षाखालील खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार दरमहा करण्यात यावा.

(५) नवीन प्रयोजनासाठी/नवीन बाबींसाठी मंजूर तरतूदीतून खर्च करण्यात येऊ नये.

(६) कॅश फ्लो विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत उपलेखाशीर्षाखालीच सदर खर्च करण्यात यावा. विभागाने परस्पर पुनर्विनियोजनाने खर्चासाठी रक्कम उपलब्ध करु नये.

(७) मान्य केलेल्या कॅश फ्लो प्रमाणे दरमहा खर्च झाला नाही तर अखर्चित रकमेस विभाग सर्वस्वी जबाबदार रहील.

(८) एखाद्या विशिष्ट प्रकरणी या विभागाने अनौपचारीक संदर्भ दिला असल्यास, त्याबाबतचे आदेश एका महिन्यात काढण्यात यावे. सदर अनौपचारीक संदर्भ एक महिन्यानंतर वापरता येणार नाही.

(९) उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे उलंघन होत असल्यास अशा प्रकारच्या प्रस्तावांना निधी वितरणापूर्वी अर्थोपाय कार्यासनाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

३. राज्याचे व्यवस्थापन, योग्यरीत्या ठेवण्यासाठी जमा व खर्चाचे संतुलन ठेवणे अगत्याचे आहे आणि म्हणून आपण उपरोक्त सूचनांचा कृपया काटेकोरपणे अवलंब करावा व आर्थिक शिस्त ठेवण्याच्या शासनाच्या धोरणास आपण सहकार्य करावे, अशी आपणास विनंती आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

ओ.पी. गहरोत्रा

(ओ.पी. गहरोत्रा)
अपर मुख्य सचिव ,महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
२) संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई.
३) महालेखापाल, मुंबई / नागपूर
४) सर्व सह/उप सचिव/अवर सचिव, वित्त विभाग
५) सर्व व्यय कार्यासने
६) निवड नस्ती, अर्थोपाय कार्यासन